# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/04/2023 (सोमवार) दुपार

## विनयभंग

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक ०१/०४/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक ०२/०४/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय २३ वर्ष ही तिच्या घराचे बाथरूममध्ये आंघोळ करीत असतांना **आरोपी नामे– गोलु उर्फ कमलेश हजारे रा देहेगाव मौदा** याने फिर्यादीला खिडकीमधुन नग्न अवस्थेत पाहीले आणि त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ काढतांनी दिसला तेव्हा तिच्या पतीने आरोपीस विचारपुस केली असता त्याच्या हातातील मोबाईल मागीतला असता त्या मोबाईल मध्ये फिर्यादी हिचे आंघोळ करतांनाचे अवस्थेतील दोन व्हिडीओ आढळुन आले तिच्या पतीने पोलीस स्टेशन मौदा येथे रिपोर्ट देते असे म्हंटले असता ''तुला जे जमते ते कर'' असे आरोपीने म्हंटले व मोबाईल मध्ये व्हिडीओ बघितले असता फिर्यादीला लज्जा वाटली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (सी), ५०६ भादवी कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना रोशन शिंदे ब. नं १९०९ मो. क्र. ९५५२५५६८६५ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. काटोल :–** अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मसली काटोल येथे दिनांक ०१/०४/२०२३ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– शेषराव हरीभाउ शेंडे, वय ५६ वर्ष रा. मसली काटोल हे आपल्या घरासमोर हजर असता तेथे आरोपी नामे– रविन्द्र महंत व त्याचा मुलगा दोन्ही रा. मसली ता. काटोल हे दोघे घरासमोर येवुन फिर्यादीला ''तु माझे शेतावर कामाला का येत नाही'' या कारणावरून फिर्यादी सोबत वादविवाद करून झगडाभांडण शिवीगाळ करून दोघांनी लाकडी काडयाने फिर्यादीच्या दोन्ही पायावर व मांडयावर मारल्याने मुका मार लागला तसेच त्यांनी मारण्याची धमकी सुदधा दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा ज्योती सेवतकर बं. नं. १७३२ पो.स्टे. काटोल हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर